# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/०८/२०२६ (बुधवार )

.......................................................................................................

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ०५ म्हशी जनावरांची सुटका, ६ लाखांचा मुद्देमाल जप्त
## उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— दिनांक १९/०८/२०२६ रोजी श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग हे त्यांच्या पथकासह कन्हान उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना पोलीस स्टेशन वडोदा हद्दीत मौजा भोवरी गावाजवळ त्यांना एक संशयित बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—४०/सी डी—५३८३ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता चालक नामे **सिद्दीक नवाब सय्यद, वय ३० वर्ष, रा. आंबागढ, ता. तुमसर, जि. भंडारा हा मिळून आला. मालकाबाबत विचारपुस केली असता अनंतराम फगुलाल डोनेकर, रा. आंबागढ, ता. तुमसर, जि. भंडारा अशी माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०५ म्हशी जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले**. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—४०/सी डी—५३८३ किंमती ५,००,०००/— रूपये आणि ०५ म्हशी जनावरे किंमती १,००,०००/— रूपये असा एकुण किंमती ६,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी आरोपी १) सिद्दीक नवाब सय्यद, वय ३० वर्ष, रा. आंबागढ, ता. तुमसर, जि. भंडारा २) अनंतराम फगुलाल डोनेकर, रा. आंबागढ, ता. तुमसर, जि. भंडारा**

**यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ११(१), (ड), (ई), (फ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ११ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, रोख रक्कम व दुचाकी वाहने, मोबाईलसह ०४ लाख ५१ हजार ४८० रूपयांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १८/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे कोंढाळी हद्दीतील ग्राम मूर्ती शेत शिवारात सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) आकाश पिंगळेश्वरजी बागडे उर्फ भगवान, वय २६ वर्ष, रा. मूर्ती ता. काटोल २) लंकेश रामेश्वर**

मोहोड, वय ३५ वर्ष, रा. जयताळा नागपूर ३) सागर जीवन कडवे, वय २९ वर्षे, रा. धर्ती तालुका कारंजा जिल्हा वर्धा ४) मोरेश्वर विजय सहारे, उर्फ चांद, वय २८ वर्ष, रा. धरती तालुका कारंजा जिल्हा वर्धा यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. तसेच ५) स्वरूप उर्फ सौरभ रामचंद्र डोंगरे, रा. मूर्ती ह. मू. जयताळा नागपूर ६) उमेश ओंकार गाखरे, रा. मूर्ती ता. काटोल ७) उमेश ईश्वर धारपुरे, रा. मूर्ती तालुका काटोल ८) मिलिंद नारनवरे उर्फ लहान्तु, रा. मूर्ती ह. मू. काटोल ९) आकाश शिवाजी रंगारी, रा. मूर्ती ता. काटोल १०) रोशन कमलाकर भोसकर उर्फ गणेश, रा. वाडी नागपूर ११) विनोद लखनलालजी मन्सुरे, रा. अंबाझरी नागपूर हे घटनास्थळावरून पळुन गेले.

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ३७,४३०/—रूपये, ०४ दुचाकी वाहने किंमती ३,४०,०००/—रूपये, ०६ अँड्रॉइड मोबाईल किंमती ७२,०००/—रूपये, ०२ ताडपत्री असा एकूण ४,५१,४८०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ११ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




**गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद**
**०४ गोवंश जनावरांची सुटका, ७ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त**
**भिवापूर पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १८/०८/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत पोस्टे टी पॉईंट येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पोलीसांना एक संशयित बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—३५/ए जे—५८०२ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता १) पन्नालाल तेजलाल लिल्हारे, वय ४६ वर्ष, २) जयप्रकाश मदनलाल मचीया, वय ३३ वर्ष, दोन्ही रा. बडेगाव पोस्ट मिरीया, ता. लांजी, जि. बालाघाट हे मिळून आले. पोलीसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०४ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत

कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच–३५/ए जे–५८०२ किंमती ७०,००००/– रूपये आणि ०४ गोवंश जनावरे किंमती ५३,०००/– रूपये असा एकुण किंमती ७,५३,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी आरोपी १) पन्नालाल तेजलाल लिल्हारे, वय ४६ वर्ष, २) जयप्रकाश मदनलाल मचीया, वय ३३ वर्ष, दोन्ही रा. बडेगाव पोस्ट मिरीया, ता. लांजी, जि. बालाघाट यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम ११(१), (क), (ड), (ई), (फ), प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम २३(१)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ६२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :– दिनांक १८/०८/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील वडद पारधी बेडा येथील रविंद्र पवार याचे पानठेल्याचे बाजूला मोकळया जागेत काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) सुरज वसंताजी सोनटक्के, वय ३१ वर्ष, रा. वडद, ता. उमरेड, जि. नागपूर २) मुकेश शिवकुमार शाहू, वय २६ वर्ष, रा. धामना ता. जि. नागपूर ३) रोहण मिस्त्रीलाल श्रीवास, वय २३ वर्ष, रा. धामना ता. जि. नागपूर ४) राम सोहन दुर्वे, वय ४४ वर्ष, रा. मटकाझरी, ता. हिंगणा नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम २५००/–रूपये, ०१ मोटरसायकल, ०१ अँड्रॉइड मोबाईल असा एकूण ६२,५००/–रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०४ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक १८/०८/२०२६ रोजी पाचगाव पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता कालडोंगरी शिवारात फोरपिलर ले आउट मध्ये ०३ इसम हे संशयितरीत्या फिरताना दिसुन आले. पोलीसांचे वाहन पाहुन सदर इसम हे अंधारात स्वत:चे अस्तित्व लपण्याचा प्रयत्न करीत होते. पोलीसांना पाहुन त्यांनी पळ काढला. त्यांना शिताफीने ताब्यात घेवुन नाव व पत्ता विचारले असता **आरोपी क्र. १) नामे आकाश जगन्नाथ खरे, वय १९ वर्ष, रा. ब्रम्हानगर साहील किराणा स्टोअर्स च्या मागे नागपूर २) रंजित मैहतलाल तरवरे, वय १९ वर्ष, रा. सर्वश्री नगर, दिघोरी गजानन प्रसाद कॉन्वेंट समोर नागपूर ३) विधीसंघर्षग्रस्त बालक अशी माहिती प्राप्त झाली.**

वरील आरोपी हे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आले. पोलीसांनी त्यांना विचारपुस केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूद्ध कलम **१२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये** गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक १८/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, विदेशी दारू असा एकुण ११,१८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे हेमराज यशवंत टापरे, वय ३१ वर्ष, रा. ताराबोडी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** आरोपी नामे १) शांताराम तुळशिराम डोंगरे, वय ६३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, नरखेड जि. नागपूर २) विश्वेश्वर नारायण सातपुते, वय ३६ वर्ष, रा. बेलोना, तह. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १) वामन महादेवराव वाघधरे, वय २७ वर्ष, रा. अडेगाव, ता. हिंगणा, जि. नागपूर २) कैलास निमदेव वाघधरे, रा. अडेगाव, ता.

हिंगणा, जि. नागपुर यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी नामे अजय चैनसिग धुर्वे, वय २३ वर्ष, रा. पहिलेपार सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा येथे** आरोपी अतिश संतोष वर्मा, वय ४५ वर्ष, रा. लोदीपुरा साई मंदीर, संत्रा मार्केट रोड भजरिया नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ६१२० मिली देशी दारू, १७७६० मिली विदेशी दारू, ०९ लिटर मोहाफुल दारू असा एकुण १११८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधीक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**